नि.दि.दा.क्र.१७/२०११.
गंगुबाई व इतर वि. दामोधर व इतर
नि.क्र. १२२ चा पुढील भाग

**प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे साक्षीदार क्र. ३**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | **नरेंद्र केवलराम तभाणे,** |
| **वय** | : | **५४ वर्षे, व्यवसाय : मंडळ अधिकारी, गुमगाव, तह-हिंगणा, जिल्हा-नागपूर** |
| **राहणार** | : | **मिसाळ लेआउट, जरीपटका, नागपूर.** |

**सरतपास प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे वकील आर.जी.नितनवरे यांचेमार्फत शपथेवर सूरु-**

मी सन-२०२४ पासुन मंडळ अधिकारी, गुमगाव, तह-हिंगणा, जिल्हा-नागपुर येथे कार्यरत आहे. आमच्या कार्यालयाने गोंदणी ता-हिंगणा येथील फेरफार नोंद क्र. १७ मधील मयत महादेव खोब्रागडे यांच्या वारसांची नोंद वारसांच्या अर्जानुसार घेतली. परंतु सदर नोंद ही सन-१९९० ची असल्यामुळे त्याबाबतचा अर्ज आमच्या कार्यालयामध्ये मिळुन आला नाही. आमच्या कार्यालयाने गुमगाव, ता-हिंगणा येथील फेरफार नोंद क्र. ७५ मधील मयत महादेव खोब्रागडे यांच्या वारसांची नोंद वारसांच्या अर्जानुसार घेतली. परंतु सदर नोंद ही सन-१९९० ची असल्यामुळे त्याबाबतचा अर्ज आमच्या कार्यालयामध्ये मिळुन आला नाही. सदर फेरफार नोंदीकरीता केलेला अर्ज हा कोणी केला हे मी सांगु शकत नाही. सदर दोन्ही फेरफार नोंदी घेतांना तलाठयांनी गावामध्ये चौकशी केली असेल, परंतु त्याबाबत मी निश्चीत सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही फेरफार नोंदी घेतांना संबधीत तलाठी यांनी कुठलीही चौकशी केली नाही म्हणुन ज्या व्यक्तीकडे चौकशी केली त्याची सही फेरफार नोंदीमध्ये नाही. फेरफार नोंद घेण्यापुर्वी सर्व वारसांना नोटीस काढण्यात येते. उपरोक्त फेरफार नोंद क्रमांक १७ व ७५ घेण्यापुर्वी कोणकोणत्या वारसांना नोटीस काढल्या होत्या, हे मी सांगु शकत नाही. आमच्या कार्यालयामध्ये सदर फेरफार नोंदी बाबतचे रेकॉर्ड मिळुन न आल्यामुळे कोणत्या वारसांना नोटीस काढली, याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कार्यालयाने सदर फेरफार करण्यापुर्वी कोणालाच नोटीस काढल्या नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**वादीतर्फे वकील श्री ए.सी.वासनीक यांच्यामार्फत उलटतपास सुरुः-**

हे मला माहिती नाही की, फेरफार नोंद क्र. १७ व ७५ मधील नोंदीला उपविभागीय अधिकारी नागपुर यांच्याकडे अपीलद्वारे आव्हानीत केले होते व सदर अपील फेटाळण्यात आली होती.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्वीकृत,

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2025.12.23 16:04:21 +0530

दि.२३/१२/२०२५.

(व्ही.एच.खेडकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, हिंगणा.